## प्रकरण दुसरे

# भारतातील मुस्लीम व्यक्तीगत कायद्याचा उगम व विकास

हिंदुस्थानात इस्लामी धर्मशास्त्राप्रमाणे जे कायदे मध्ययुगापासून ते ब्रिटिशांच्या आगमना पर्यंत विकसित होत गेले. त्यांच स्वरूप पहिल्याच प्रकरणात थोडक्यात पाहिले. त्या एकूण सर्व कालखंडात इस्लाम मधील व्यक्तीच्या कौटुंबिक जीवनासंबंधीच्या कायदयाचा उल्लेख " मुस्लीम व्यक्तीगत कायदा " म्हणून कोठे ही केला जात नव्हता, तर मुस्लीम धर्म शास्त्रानुसार इस्लामी "शारिया" चे कायदे किंवा इस्लामी फिकाह चे कायदे असेच शब्द प्रयोग केले जात होते आणि त्यामध्ये सर्व प्रकारच्या कायदयाचा समावेश होता मुस्लीम व्यक्तीचे जीवन इस्लामी शारियतनुसार नियंत्रित करण्याचे तत्व असले तरी प्रत्यक्षात कुराणप्रणित फौजदारी कायदे अंमलात नव्हते फक्त कौटुंबिक जीवनासंबंधीचे आणि मुस्लीम व्यक्ती मधील भांडण, तंटयासंबंधीचे नियम आणि व्यवहार हे शारियत म्हणजे ~~फिकाटा~~ फिकाह नुसार नियंत्रित केले जात होते. त्यात ही " हिदाया " फतवा-ए आलमगिरी " सारखे धर्मशास्त्रावरील प्रचलित ग्रंथ हे हिंदुस्थानातील इस्लामी शारियतचा आधार म्हणून वापरले जात होते. त्याशिवाय " शिया " पंथीयाचे धर्मशास्त्र आणि त्या वरील धर्मशास्त्राचे आधारभूत ग्रंथ हे वेगळेच होते. शिवाय हिंदुस्थानातील अनेक भागात असलेल्या अनेक मुस्लीम जमातीचे कायदे हे हिंदुस्थानात असणा-या शारियत"च्या कायदयाला सोडून होते. त्यांचा उल्लेख नंतर करण्यात येईल. या सर्व प्रकारात मुस्लीम व्यक्तीगत कायदा म्हणून वेगळी अशी कायदे पध्दती अस्तीत्वात नव्हती.

मुस्लीम व्यक्तीगत कायदा आणि त्यांची मांडणी ब्रिटिश ईस्ट इंडिया कंपनीच्या राजवटीतील वॉरन हेस्टिंग्ज आणि लॉर्ड कार्नवॉलिस यांच्या कारकिर्दीत तथाकथित "मुस्लीम व्यक्तीगत कायदा" निर्माण केला गेला. आणि पुढे हिंदुस्थानातील मुसलमाना संबधीच्या कायदयाला " मोहामेडन लॉ " असे म्हटले जावू लागले आणि शारियतचा

कायदा असे म्हटले जात नव्हते. ब्रिटिश सरकारने १९३७ मध्येय केलेल्या कायदयाचे नाव " दि शारियत ॲक्ट " असे होते. आणि त्यामध्ये " दि मुस्लीम पर्सनल लॉ " असा उल्लेख होता आणि कंपनी सरकारच्या काळात मुस्लीमांच्या कौटुंबिक जीवना संबंधीचे केले जाणा-या कायदयेबचे उल्लेख " पर्सनल लॉ संबंधीचे कायदे असे केले जात होते".[१] ब्रिटिश राजवटीत, मुसलमानांना मुस्लीम व्यक्तीगत कायदा लागू केला गेला आणि धोरण म्हणून त्या कायदयाची अंमलबजावणी धर्माचा एक भाग म्हणून केली जात नव्हती. कंपनी सरकारच्या काळापासूनचे ब्रिटिशाचे धोरण सर्व प्रकारच्या प्रकरणात धार्मिक कायदा लागू करण्याचे नव्हते. तर वारसाहक्क लग्न जातीय व धार्मिक प्रथा रिती-रिवाज किंवा संस्था यांच्याशी संबधित असणा-या बाबतीतच हिंदूना हिंदू कायदा व मुसलमानांना मुस्लीम कायदा लागू करण्याचे होते.".[२]

कंपनी सरकारच्या काळात जेव्हा ब्रिटिशांनी न्यायालयांची स्थापना करून हिंदू आणि मुसलमांनाना कायदे लागू करण्याचे धोरण स्विकारले तेव्हा त्यांना हिंदुस्थानातील हिंदूचे हिंदू धर्मशास्त्रानुसार असणारे कायदे आणि मुसलमानांचे इस्लामी धर्मशास्त्रानुसार असणारे कायदे अत्यंत गुंतागुंतीचे वाटले. त्यात ही ठिकठिकाणी मुस्लीम राज्यकर्त्यांचे कायदे अस्तित्वात असल्यामुळे इस्लामी कायदे प्रकर्षाने जाणवत होते. ब्रिटिश राज्यकर्त्यांनी हे धर्मनिहाय कायदे बदलून धर्मनिरपेक्ष आणि ब्रिटिशांच्या तत्वानुसार कायदे करण्याचे धोरण स्विकारले त्यांनी एका मागून एक हिंदू-मुसलमानांचे फौजदारी कायदे बदलले आणि " इंडियन पिनल कोड ", " दि क्रिमिनल प्रोसेजर कोड, दि. एव्हिडन्स ॲक्ट आणि दि सिव्हिल प्रोसिजर कोड तयार केले. मनात आणले असते तर ब्रिटिश राज्यकर्त्यांना, ब्रिटिश राज्यकर्त्यांना त्यांचा दिवाणी कायदयात व्यक्तिगत कायदयाचा समावेश करता आला असता परंतु राज्यकारभाराचे धोरण म्हणून त्यांनी कौटुंबिक जीवन नियमित करणारे कायदे त्या त्या जमातीच्या धर्मानुसार ठेवण्याचे धोरण स्विकारले. त्यामधूनच जमात निहाय, व्यक्तीगत

कायदयाचा उदय झालेला आहे.[3] त्यांचे दुसरे कारण ही असे होते कि हिंदुस्थानातील लोकांना, त्यांचा कौटुंबिक कायदयात होणारे बदल त्यांच्या धर्मामध्ये हस्तक्षेप आहे. असे वाटत होते. त्यामुळे शक्य तो जनतेच्या कौटुंबिक कायदयात हस्तक्षेप न करण्याचे धोरण त्यांनी स्विकारले पण त्याच बरोबर हे कौटुंबिक कायदे पूर्णपणे धार्मिक स्वरूपात ठेवणे देखील त्यांना मान्य नव्हते.[४] त्यामुळे त्यात थोडे फार बदल करून व्यक्तीगत कायदयाची संहिता तयार करण्याचे धोरण त्यांनी स्विकारले, त्यासाठी शास्त्रीय पंडित, काझी, यांची मदत घेणे आणि ब्रिटिश न्यायाधिशा तर्फे निवाडे देणे या गोष्टी केल्या.

सर्व प्रथम " हिंदू कायदा " आणि मुस्लीम व्यक्तिगत कायदा यांना बंगालच्या ब्रिटिश प्रशासनात पहिल्यांदा मान्यता देण्यात आली. वॉरन हेस्टिंग्ज यांनी १७७२ च्या तयार केलेल्या न्यायालयाने योजनेत " अदालत " पध्दतीचा पाया घातला. गेला आणि म्हटले की, " वारसाहक्क, लग्न जाती आणि जमातीच्या प्रथा आणि संस्था या संबंधिचे कायदे कुराणानुसार आणि शास्त्रानुसार ठेवण्याचे धोरण स्विकारले जाईल," ( १७७२ चा कायदा कलम २३ ) हेस्टिंग्ज यांच्या मत होते की हिंदुस्थानातील लोकांना त्यांना माहित नसलेल्या कायदयाप्रमाणे वागायला लावणे, हे चुकीचे होईल आणि हिंदू आणि मुसलमानांचे जे कायदे ब्रिटिश सत्तेला धोकेदायक वाटत नाही. ते जसेच्या तसे ठेवल्याने काही बिघडत नाही.[5] वॉरन हॅस्टिंग्ज यांनी कुराण प्रणित कायदे आणि धर्मशास्त्रानुसार कायदे यांची व्याख्या केली नाही. १७७२ च्या कायदयात हिंदूच्या मिताक्षर दायभाग, कायदयाचे किंवा मुस्लीमात असणाऱ्या चार प्रकारच्या कायदयापध्दतीचे तसेच हिदाया किंवा फतवा आलमगिरीचे उल्लेख नव्हते. तसेच हिंदू आणि मुसलमानेचे कायदे विषयक प्रथाचे उल्लेख ही नव्हते.

त्यानंतर लॉर्ड कार्नवालिस यांनी केलेल्या १७८१ व १७९३ च्या कायदयात हिंदू आणि मुसलमानांच्या व्यक्तिगत कायदयासंबंधी आणखीन काही नियम करण्यात आले आणि पुढे १८६१ च्याकायदया पर्यंत त्यात वेग-वेगळ्या प्रकारच्या सुधारणा करण्यात आल्या. १७९५ पासून ही अदालत पध्दती बनारस पासून ते मद्रासपर्यंत मुसलमानांना लागू करण्यात आली. मुंबई प्रांतात १८२७ मध्ये त्याचा विस्तार करण्यात आला. आणि पुढे हीच अदालत पध्दती पंजाब, आसाम, मध्य प्रांत वगैरे भागात विस्तारीत करण्यात आली.[६] तसेच पुढे कलकत्ता, मुंबई, मद्रास उच्च न्यायालयाची स्थापना झाली. १८७२ ते १९०१ च्या कालखंडात दिवाणी न्यायालयांची फेर रचना करण्यात आली १८७२ मध्ये दि पंजाब लॉज ॲक्ट मंजूर करण्यात आला आणि त्या कायदयामध्ये हिंदू आणि मुसलमानांचे व्यक्तीगत कायदयाना त्यात्या प्रदेशात असणा-या प्रस्थापित आणि प्रचलित प्रथा आणि रूढी, यांच्या तुलनेने दुय्यम स्थान देण्यात आले. ही व्यक्तीगत कायदयाना दुय्यम स्थान देण्याची सुरवात होती.[७] अशाप्रकारे १७७२ ते १९०१ च्या कालखंडात जरी ब्रिटिशांनी हिंदू आणि मुसलमानांच्या कौटुंबिक कायदयांची मांडणी आणि रूपांतर व्यक्तीगत कायदयामध्ये केले तरी हळू हळू धार्मिक रूढी आणि प्रथा ना व्यक्तीगत कायदयापेक्षा वरचे स्थान दिले. हे करीत असताना ब्रिटिश न्यायाधिश आणि कायदे करणा-यांनी हिंदू आणि मुसलमान असा भेद केला नाही. वास्तविक इस्लामी शारिया मध्ये हिंदू धर्मशास्त्राप्रमाणे रूढी आणि प्रथांना स्थानच नव्हते. परंतू ताहिर मेहमुद यांच्या मते मलबार मधील मोपला मुसलमान आणि पंजाब व मध्यप्रांतातील काही मुस्लीम जमातींचे कायदे त्या भागातील प्रथा आणि रूढीवर आधारित होते. त्यामुळे ब्रिटिशांनी तीच मोजपट्टी मुस्लीम कायदयाला ही लावली.[८] मोपला लोकात शाफई कायदे पध्दती असली तरी दक्षिण कर्नाटकातील

हिंदू प्रथा प्रमाणे वारसा हक्कांचे नियम होते त्याचप्रमाणे कच्छी मेमन जमातीचे देखील वारसा हक्का संबंधीचे नियम "शारियत" नुसार नव्हते.

मलबारमध्ये तसेच पंजाब आणि मध्यप्रदेशात मुस्लीम धर्मगुरुंनी त्या संबंधीची चळवळ सुरु केली. परिणामी १९१८ "मोपला वारसा कायदा" मंजूर करण्यात आला, कच्छी मेमन" यांच्या साठी १९२० मध्ये कायदा करण्यात आला. मोपला आणि मेमन यांच्या प्रमाणेच वायव्य सरहद्द प्रांत काश्मिर इ. भागात असेच गैर इस्लामी नियम आणि प्रथा आस्तीत्वात होत्या. स्त्रियांना अनेक ठिकाणी वारसा हक्कच नव्हते. विशेषत: मुस्लीम नवाब आणि तालुकेदार हे या बाबतीत गैरइस्लामी प्रथांचा वापर करीत होते. त्यामुळे त्या काळात मुस्लीम धर्मगुरुकडून "शारियत"नुसार कायदे तयार करण्याची मागणी जोर धरु लागलेली होती. या सर्वाचा परिणाम म्हणून १९३५ मध्ये वायव्य सरहद्द प्रांतासाठी शारियत कायदा करण्यात आला आणि त्या कायदयात पहिल्या प्रथम "शारियत आणि मुस्लीम व्यक्तीगत कायदा हे शब्द स्पष्टपणे वापरण्यात आले. तत्पूर्वी वॉरन हेस्टिंग्ज यांच्या १७७२ च्या कायदयात "कुराणाचे कायदे" असा शब्दप्रयोग होता. अशाप्रकारे वेगवेगळया भागातील प्रथा आणि रुढी काढून काढून टाकण्यासाठी हा "शारियत"चा कायदा केला गेला. आणि मुळात "मुस्लीम व्यक्तीगत कायदयाची निर्मिती ज्या रुढी आणि प्रथा मुस्लीम स्त्रियांना हक्क नाकारत होते, ते रद्द करण्यासाठी करण्यात आलेला होता.[१] ही महत्वाची गोष्ट मुस्लीम व्यक्तीगत कायदयाचे नाव घेवून या दोन दशकात मुस्लीम स्त्रियांना हक्क नाकारणारे लोक विसरतात. पुढे हाच कायदा वाढवून सुधारित स्वरुपात १९३७ चा मुस्लीम व्यक्तीगत कायदा ( शारियतचा कायदा म्हणून सर्वत्र लागू केला गेला. अशा प्रकारे भारतात मुस्लीम व्यक्तीगत कायदयंची सुरुवात झालेली दिसून येते. आणि पुढे १९३९ मध्ये

" मुस्लीम विवाह विघटनाचा " कायदा ब्रिटिशांनी केला. केवळ या कायदया मार्फतच ब्रिटिशांनी हिंदुस्थानात मुस्लीम कायदयांचे जे वेगवेगळे प्रवाह होते. त्याच्यात सुधारणा करण्याचे प्रयत्न केले. अशा प्रकारे हिंदुस्थानात मुस्लीम व्यक्तिगत कायदयांची प्रस्थापना झाल्याचे दिसते.

यावरुन दोन गोष्टी स्पष्ट होतात. एक तर मुळ पवित्र कुराणा-नुसार किंवा " इस्लामी फिकाहा" च्या चार कायदे पध्दतीनुसार " व्यक्तिगत कायदा " या नावाची कायदे पध्दती अस्तित्वात नव्हती. अशी कायदेपध्दती ब्रिटिशांच्या राजवटीत तयार करण्यात आली. दुसरी गोष्ट म्हणजे ब्रिटिशांनी तयार केलेली मुस्लीम व्यक्तीगत कायदयाची कायदे पध्दती ही " पवित्र कुराण " हदित " यांच्या प्रमाणे नव्हतीत तर हिंदुस्थानात हिदाया किंवा फतवा-ए-आलमगिरी सारखे जे धर्मशास्त्राचे ग्रंथ निर्माण झाले होते, त्याचा काही प्रमाणात आधार घेतलेला होता. विशेषत: ११ व्या १२ व्या शतकात जे मुस्लीम धर्मपंडित मध्य आशिया आणि हिंदुस्थानात होवून गेले, ज्यांनी त्यांच्या समजुती नुसार, कुराण आणि हदिस जे अर्थ लावलेले होते त्यांचा आधार त्यात घेतलेला होता. कियास आणि इज्तिहाद" या दोन्हीचे दरवाजे बंद झालेले असल्यामुळे, ११ व्या १२ व्या शतकातील इस्लामी कायदेशास्त्र पोथी निष्ठता आली होती. या सर्वांचा प्रभाव ब्रिटिशांनी केलेल्या कायदयात दिसून येतो.

मौलाना मिन्नतुल्लाह रहमानी यांनी म्हटल्याप्रमाणे हिंदुस्थानातील मुस्लीम व्यक्तिगत कायदा, पवित्र कुराणातील तत्वे हदीस मध्ये त्या संबधीचे केलेले विवेचन किंवा " इज्मा " वै " कियास " पध्दतीने घेतलेले निर्णय तसेच इस्लाम मधील कायदेशास्त्राच्या चार प्रवाहामध्ये दिलेले नियम यांच्यावर आधारलेला नाही. " मुस्लीम व्यक्तीगत कायदा हा वारसा हक्क, लग्न, घटस्फोट, मेहेर आणि वक्फ मालमत्ता यांच्या पुरताच संबंधित ठेवण्यात आलेला आहे. ( फरीदी आणि सिद्दीकी

मुस्लीम पर्सनल लॉ - इस्लामिक रिसर्च सर्कल अलीगढ- १९७३ - मौ रहमानीचा लेख - पान ६६, ६७ )[10]

## मुस्लीम व्यक्तीगत कायदयाचा ब्रिटिश प्रणित निर्मितीची, प्रक्रिया:

वरील प्रकारे " मुस्लीम व्यक्तीगत कायदयाचे सर्व सामान्य स्वरूप पाहिल्या नंतर, प्रत्यक्षात ब्रिटिशांनी मुस्लीम व्यक्तीगत कायदयाचे निर्मिती कशी केली, हा त्या संबंधीचे नियम कसे अंमलात आणले हे पाहणे उद्बोधक ठरेल. प्रा. ताहिर मेहमुद यांनी "पर्सनल लॉज इन क्रायसिस " या आपल्या पुस्तकातून त्या संबंधी केलेले विवेचन मुलभूत स्वरूपाचे आणि आणि अत्यंत महत्वाचे आहे. त्यावरून हिंदुस्थानातील मुस्लीम व्यक्तीगत कायदयाचे "वास्तव स्वरूप " स्पष्ट होते. मागे सांगितल्याप्रमाणे ब्रिटिशांनी हिंदुस्थानावर राज्य करण्यास सुरवात केल्या नंतर त्यांनी हिंदुस्थानातील हिंदु-आणि मुसलमानाचे आस्तीत्वात असणारे कायदे, रूढी आणि प्रथा बदलण्याचे निर्णय घेतले. त्याचबरोबर कौटुंबिक आणि व्यक्तीगत बाबतीत हिंदु आणि मुसलमानाच्या धर्ममध्ये हस्तक्षेप केला जाणार नाही. अशी आश्वासने देखील देत राहिले. परंतु त्याचबरोबर हिंदूस्थानी लोकांच्या अस्तित्वात असलेल्या कायदयाचे सुधारणा करण्याच्या नावाखाली, अनेक विपर्यस्त बदल केले. विशेषत: इस्लामी कायदे शास्त्रात त्यांनी केलेले बदल अत्यंत चुकीचे होते. किंबहुना ब्रिटिशांनी मुस्लीम व्यक्तीगत कायदा" म्हणून इस्लामी कायदयात चूकीचे भाग घुसवडून दिले. हे ब्रिटिशानी स्विकारलेली पध्दती आणि प्रक्रियेवरूनच हे स्पष्ट होते. सर्वप्रथम ब्रिटिशांनी १८६४ मध्ये " काझी प्रणित " मुस्लीम न्यायालये रद्द केली. आणि " काझी प्रणित न्यायालयाचे अधिकार ब्रिटिश न्यायाधिश असणा-या दिवाणी न्यायालयाना दिले. काझी न्यायालयातील न्यायाधिश म्हणून काम करणारे काझी हे इस्लामी कायदे शास्त्रातील तज्ञ असत. "काझी" हे इस्लामी कायदे

इस्लामी कायदेशास्त्रातील तज्ञ असत " काझी " न्यायालय काढून टाकल्याने अशा तज्ञ " काझी " ची इस्लामी न्यायशास्त्राची हकालपट्टी झाली. ब्रिटिश राज्यकर्त्यांने या तज्ञ काझी ऐवजी इंग्रज न्यायाधीशांना मुसलमानी खटल्याबाबत मदत करण्यासाठी " स्थानीक मुसलमान कायदे सल्लागार " ( नेटिव लॉ ऑफ रिसर्च ) नेमण्याची प्रथा सुरु केली हे तथाकथित कायदेविषयक सल्लागार तज्ञ नसत शिवाय इग्रज न्यायाधिश त्यांचे फारसे न ऐकता स्वत:च आपल्या ज्ञानाप्रमाणे निवाडे देत असत. त्यामुळे इंग्रज न्यायाधिशाचा दिलेला निर्णय हे वादग्रस्त स्वरूपाचे होते. त्या निर्णयाच्या आधारानेच मुस्लिम व्यक्तिगत कायदा हिंदूस्थानात विकसित झाला आहे.

दुसरे म्हणजे ब्रिटिश राज्यकर्त्यांनी इंग्रज न्यायाधिशांना उपयुक्त व्हावे म्हणून हिंदूस्थानात त्या वेळी अस्तित्वात असणा-या इस्लामी कायदे शास्त्रावरील ग्रंथाचे भाषांतर करण्याची योजना आखली ताहिर मेहमूद यांच्या प्रतिपादनानुसार अशी बरीच भाषांतरे दोष पूर्ण होती. उदा. हिदाया या सुप्रसिध्द ग्रंथाचे भाषांतर हॅमिग्टन यांनी केले तेच अदयापी अस्तित्वात आहे. हॅमिग्टनच्या भाषांतरातील दोष आणि चुका त्या काळात मौलवी मंहमद रशादी यांनी तत्कालीन सर न्यायाधिश टी. एच. हॅरिग्टन यांच्या नजरेत आणलेली होती परंतु त्यासंबंधी सर न्यायाधिशानी कोणतीच कृती केली नाही हे दोषपूर्ण भाषांतर तसेच राहिले.

परिणामी आपल्या भाषांतराना आक्षेप येत आहे हे पाहून ब्रिटिशांनी इस्लामी धर्मशास्त्रावरील पुस्तकाचे भाषांतर करण्याची कल्पना सोडून दिली. " फतवा-ए" आलमगिरी या ग्रंथाचे भाषांतर कार्य थांबविण्यात आले. त्याऐवजी इंग्रज न्यायाधिशाच आपल्या कुवतीनुसार इस्लामी कायदयाचा अर्थ लावू लागले आणि निर्णय देवू लागले. या सगळया प्रक्रियेमुळे मूळ इस्लामी " फिकाहा" मधील कायदयांचे अत्यंत विपर्यस्त अर्थ लावले गेले आणि विशेष म्हणजे ब्रिटिशानी असे विपर्यस्त अर्थ लावून मूळच्या इस्लामी कायदयाचे विकृतीकरण केले. [११]

दोषपूर्ण भाषांतराप्रमाणेच त्या काळातील ब्रिटिश कायदे पंडितानी इस्लामी कायदयावर लिहलेली पुस्तक मोठया प्रमाणात दोष पूर्ण होते. उदा. डब्ल्यू एच. मॅक्नॉटन, एन ई. बेली, फिट्ज रॅालड, विल्सन यांनी लिहिलेले मुस्लीम कायदया वरील ग्रंथ दोषपूर्णच आहेत यात भार म्हणून १९०६ मध्ये सर. डी. एफ. मुल्ला यांनी मुस्लीम कायदया विरोधी जो ग्रंथ लिहिला तो वरील सर्व दोषपूर्ण साधनावरच आधारित आहे. आणि आजपर्यंत मुल्ला यांचेच इस्लामी कायदयावरील ते पुस्तक अधिकृत म्हणून वापरले जात आहे. विशेष म्हणजे अलिकडच्या काळात मुल्ला यांच्या या ग्रंथाची नवीन आवृत्ती काढत असताना त्यांचे संपादन सर सुलतान अहमद नंतर न्यायमूर्ती हिदायतुल्ला यांनी केलेले दिसून येते. ताहिर मेहमूद म्हणतात. त्याप्रमाणे आश्चर्याची गोष्ट म्हणजे न्यायमूर्ती, हिदायतुल्ला यांनी देखील मुल्ला यांनी वापरलेली साधने बरोबर आहे कां, हे तपासून पाहिलेले नाही. [१२]

इस्लामी कायदयाचे विकृतीकरण करणारा आणखीन एक घटक म्हणजे त्या काळातील अर्धशिक्षित मौलवी होते. ब्रिटिशांनी काझी न्यायालये रद्द केल्यानंतर तज्ञ आणि अनुभवी काझीच्या ऐवजी प्रत्येक ठिकाणी ब्रिटिश न्यायाधिशांना माहिती देण्यासाठी

प्रत्येक ठिकाणच्या मशीदीतले अपुरे ज्ञान असलेले मौलवी नेमले. पुढे याच मौलवींचे प्रस्थ वाढले व त्यांनी ठिकठिकाणी इस्लामी कायदयाचे विपर्यस्त अर्थ लावले. याचा अर्थ असा नव्हे कि त्या काळात इस्लामी कायदेशास्त्रावर चांगले ग्रंथ लिहिले गेलेच नाही. तर " अल्लामाशिबलीनुमानी " मौलाना अशरफ अली थोनवी किंवा मौलाना हुसेन अहमद मदनी " या सारखे सर्वमान्य तज्ञ धर्म पंडित होऊन गेले. त्यांनी इस्लामी कायदेशास्त्रावर अत्यंत अभ्यासपूर्ण लिहिलेल्या ग्रंथाची दखल घेतली गेलेली नाही.

वरील सर्व प्रक्रियेवरुन भारतात असणाऱ्या मुस्लीम व्यक्तीगत कायदयाचे स्वरुप स्पष्ट होते. ते म्हणजे, भारतातील मुस्लीम व्यक्तीगत कायदा हा इस्लामी शरिया किंवा मुळच्या इस्लामी धर्मशास्त्रानुसार नाही. इतकेच नव्हे तर हिंदुस्थानात विकसित झालेल्या मुस्लीम कायदयाची उत्पत्ती साधने ही देखील अत्यंत दोष पूर्ण विपर्यस्त राहिलेली आहेत. या भंयकर प्रकाराकडे अदयाप फारसे कोणाचे लक्ष गेलेले नाही. जेथे न्यायमूर्ती हिदायतुल्ला जे भारताच्या सर्वोच्च न्यायालयाचे सर न्यायाधिश होते, यांचे लक्ष या विपर्यस्त प्रकाराकडे गेलेले नाही, तर इतरांच्या बाबतीत काय बोलता येणार, आणि याच कायदयाला सर्वसामान्य पणे " कुराण शरिफ " चा कायदा किंवा " शरियत " चा कायदा असे मानले जाते. हा एकूण प्रकारच आश्चर्यजनक आहे. कारण या दोषपूर्ण मुस्लीम व्यक्तीगत कायदयाची अमंलबजावणी स्वातंत्र्यानंतरच्या भारतात देखील केली जात आहे. आणि यात कोणतेही बदल करण्यास फार मोठा विरोध होत आहे. एका अर्थाने हे सर्व अज्ञाना पोटी घडत आहे, असे म्हणणे चुकीचे होणार नाही.

मुस्लीम व्यक्तीगत कायद्यांची दोषपूर्ण स्वरूप लक्षात येण्यासाठी काही उदाहरणे नमूद करणे आवश्यक ठरेल. त्या उदाहरणावरून ब्रिटिश राज्यकर्ते न्यायाधिश भाषांतरकार आणि कायदेपंडित यांनी कसे चूकीचे अर्थ लावलेले आहेत हे दिसून येईल. यासाठी इस्लाम मधील विवाह पध्दतीचाच विचार करायला काही हरकत नाही. डी. एफ. मुल्ला यांनी इस्लामी विवाहाची संकल्पना स्पष्ट करीत असताना म्हटले आहे की इस्लाम मध्ये प्रजोउत्पादन आणि मुलांना कायदेशीर स्वरूप देण्यासाठी केला गेलेला " करार" असतो.[13] येथे मुल्ला यांनी ब्रिटिश कायदेपंडित हॅमिल्टन आणि बेली यांनी लावलेल्या चूकीच्या अर्थाचा आधार घेवून विवाहाला " करार " असे म्हटले आहे. येथे " अक्द " या अरबी शब्दांचा चूकीचा अर्थ लावला आहे. " अक्द म्हणजे करार " होत नाही. तर " एकमत " किंवा " एक वाक्यता" असा त्यांचा अर्थ होतो. ब्रिटिशांनी त्याचा अर्थ करार असा लावून कराराचे उद्दिष्टे म्हणून प्रजोत्पादन आणि मुलांना कायदेशीर स्वरूप देणे अशी मांडणी केली. " पवित्र कुराणात "विवाह म्हणजे स्त्री-पुरूषातील पवित्र बंधन ( मिसाकनगलीजा- कुराण ४ : २१ ) असे म्हटले आहे. विशेष म्हणजे दुरान्वयाने देखील कुराणातील कोणत्याही श्लोकात लग्न म्हणजे दिवाणी करार असा अर्थ सूचित होत नाही. तेव्हा इंग्रज कायदे पंडितानी मुस्लीम व्यक्तीगत कायदयाचे असे अर्थ लावलेले आहे.

मेहेरच्या बाबतीत देखील असाच प्रकार केलेला दिसून येतो. मेहेरचा अर्थ लावताना काही कायदे पंडितानी त्यांची तुलना हिंदू-पध्दतीतील हुंडा पध्दतीची केली आहे. तर काही पंडितानी विवाहाचा मोबदला ( कनसिडरेशन किंवा एक्सचेंज ) असा अर्थ लावलेला आहे. मुल्ला यांनी तोच अर्थ घेतलेला आहे. वास्तविक मेहेरची संकल्पना ही मुस्लीम स्त्रीयांच्या आर्थिक हक्क आणि स्वायत्ततेसाठी आहे. त्या संबंधीचे विवेचन नंतरच्या प्रकरणात करण्यात येईल.

असाच प्रकार बहुपत्नीत्वाच्या तथाकथित इस्लामी कायदया बद्दल केला गेला आहे. डी. एफ. मुल्ला यांनी त्या संबंधी पुढीलप्रमाणे लिहले आहे. " मुसलमान व्यक्तीला चार बायका करता येतात, परंतू जास्त करता येत नाही. चार बायका असताना त्यांनी पाचवीशी लग्न केले तर ते धर्मबाहय होत नाही तर " अनियमित प्रकारचा विवाह होतो"[14] वास्तविक कुराणातील श्लोकात कोणत्याही परिस्थितीत कोणत्या कारणानुसार आणि कोणत्या अटीनुसार अशी अपवादात्मक सवलत सांगण्यात आली आहे, याचा कसलाही विचार न करता मुल्ला यांनी सरळ-सरळ चार बायकांचा "कायदा" म्हणूनच त्यांची मांडणी केलेली आहे. विशेष म्हणजे मागील प्रकरणात सांगितल्याप्रमाणे कुराणात बहुपत्नीत्वाच्या कायदयाचे समर्थन नाही किंवा त्याला मान्यता ही नाही, केवळ अनिर्बंध विवाहाना मर्यादा घालण्यासाठी अपवादात्मक परिस्थितीत दिली गेलेली सवलत होती., परंतु डी. एफ. मुल्ला आणि त्यांच्या सारख्या अनेक कायदेपंडितानी मात्र आपल्या कायदे पुस्तकात अनिर्बंध बहुपत्नीत्वाचा कायदा आहे हे दाखवून त्यांचा आधार म्हणून धर्मग्रंथावर जबाबदारी टाकली आहे. अशया प्रकारचे बहुपत्नीत्व कुराणाला मान्य नाही.

याही पेक्षा चुकीचा प्रकार " मुटा" नावाच्या विवाहाप्रकाराचे विवेचन करताना मुल्ला यांनी केलेला आहे " मुटा" हा विवाह प्रकार काही काळा पुरता तात्पुरत्या स्वरुपात केला जाणारा विवाह, या संबंधीचा आहे. असे " मुटा" पध्दतीचे विवाह शिया पंथीयातील काही उपपंथात केले जातात. त्याला कुराणात कोठेही आधार नाही. किंबहूना हनफी शाफई आणि इस्माईली कायदे पध्दतीत त्याला अजिबात मान्यता नाही. हंबली, मलकी झैदी, कायदे पध्दतीत देखील त्यांला मान्यता नाही. असे असताना या मुटा विवाहपध्दतीचा आधार घेवून त्यांच्या आधारे मुस्लीम विवाह पध्दतीचे विवेचन करताना मुल्ला असे म्हणतात कि " ख्रिश्चन किंवा पारशी विवाहाप्रमाणे मुस्लीम विवाह

कायम स्वरूपाचा नसतो तर मुस्लीम पती आपल्या पत्नीला कधीही घटस्फोट देऊ शकतो. या विवेचना इतके विकृतीकरण दुसरे कोणतेही आढळणार नाही. कारण ज्या विवाह पध्दतीला इस्लामी "फिकाह" मध्ये मान्यताच नाही. ती विवाह पध्दती प्रमुख मानून त्यांच्या आधाराने इस्लाम मधील सर्व विवाह पध्दतीचे " तात्पुरते विवाह " पध्दती म्हणून " वर्णन केले गेले आहे. हे मुल्ला, दिनशा, फरिदून जी मुल्ला असे त्यांचे नाव होते व ते पारशी गृहस्थ असून त्यांच्या मूळ ग्रंथाचा अभ्यास नव्हता. यासंबंधीचे विवेचन देखील ताहीर मेहमुद यांनी केलेले आहे.

## भारतातील मुस्लिम व्यक्तीगत कायद्यातील विसंगती आणि परस्परविरोधी प्रवाह :

वरील सर्व विवेचनावरून एक गोष्ट एकदम स्पष्ट होते की भारतात अस्तित्वात असणारा कायदा हा वेगळा असून व्यक्तीगत कायदा म्हणजे कुराण प्रणित किंवा हदिस प्रणीत कायदा, असे समजणे पूर्णपणे चूकीचे आहे. वरील विवेचनावरून दुसरी एक महत्वाची गोष्ट लक्षात येते ती म्हणजे भारतात प्रचलित असणा-या मुस्लीम व्यक्तीगत कायदयात दैवी अंशा पेक्षा मानवी अंश आणि मानवी चूकाच जास्त आहेत हिंदुस्थानात प्रचलित असणा-या इस्लामी फिकाहा मधील विविध प्रथांच्या मुसलमानाचे जे कायदेविषयक प्रभाव आहेत. त्यांचा अंशात्मक आधार घेवून आणि मोठया प्रमाणात चूकीचे अर्थ लावून तयार केलेले नियम हे येथील व्यक्तीगत कायदयात आहे. मुल्ला यांनी लावलेल्या अर्थावरून ही गोष्ट स्पष्ट होते.

दुसरी एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे जो काही व्यक्तीगत कायदा भारतात अस्तित्वात आहे, त्यांचे स्वरूप देखील एकजिनसी नसून त्या मध्ये अनेक विसंगत आणि परस्पर विरोधी प्रवाह आहेत. वास्तविक मुस्लीमाशिवाय बाकीच्या अनेक जमातीनी आप-आपल्या कायद्याचे संहितीकरण करण्याचा प्रयत्न केला आहे. मुस्लीम व्यक्तीगत कायद्याचे एकजिनसी संहिती करण ( कोडे फिकेशन ) झालेले नाही. विशेष म्हणजे भारतातील मुस्लाम कायद्याची व्याप्ती ही " दि मुस्लीम पर्सनल लॉ " ( शारियत ) १ ॲपलीकेशन ॲक्ट ऑफ १९३७ या कायद्याने निश्चित केली गेली आहे. तेथेच मुस्लीम कायद्याच्या मर्यादा म स्पष्ट होतात. कारण ब्रिटिशांनी केलेल्या कायद्यावरून मुस्लीमांचा कौटुंबिक फायदा नियंत्रित केला गेला आहे.

आणखीन एक गोष्ट म्हणजे वरील १९३७ च्या कायद्या खेरीज, भारतात अशा अनेक मुस्लीम जमाती आहेत की त्यांच्या साठी त्यांचे स्वातंत्र्य कायदे आहेत. केरळ मधील " मोपला " जमातीला १९१८ चा वारसा कायदा १९२८ " मुखतार पत्राचा कायदा हे स्वतंत्र पणे लागू होतात. " कच्छीमेनन यांच्यासाठी देखील १९३८ चा स्वतंत्र कायदा आहे. विशेष म्हणजे " मोपला " जमातीचे कौटुंबिक कायदे १९३७ च्या कायद्यावरून नियंत्रित न होता अद्याप ही त्यांच्यात प्रचलित असलेल्या " रूढीप्रणित " कायद्यावरूनच नियंत्रित होतात.[१५]

तसेच जो काही व्यक्तीगत कायदा येथे अस्तित्वात आहेत. त्याची व्याप्ती अत्यंत मर्यादित असून तो फक्त काही कौटुंबिक बाबीनाच लागू होतो. त्यात ही एकजिनसी पणा नाही. मेहेर ( डावर ) संबंधीच्या काही तरतुदी फक्त उत्तर भारतातील आंध आणि जम्मु काश्मिर या प्रदेशांनाच लागू होतात. आणि बाकीच्या ठिकाणी मेहेरची रक्कम कशी ठरवावी या बद्दलच काहीच नियम नाही.[१६]

मुळात १९३९ च्या " मुस्लीम विवाह विच्छेदनाचा जो कायदा केला गेला त्यांच्या अनेक कारणापैकी एक कारण असे होते की त्या काळात मुस्लिम स्त्रियांना आपल्या पतीपासून फारकत घेण्याची सोय उपलब्ध नव्हती ज्यांना फारकत घ्यायची असे अशा स्त्रिया धर्मांतर करीत असत. अशया धर्मांतरांचे प्रमाण खूप वाढलेले होते. त्यामुळे मौलवी अशरफ अली थान्वी " सारख्या धर्मपंडितानी त्या विरूध्द चळवळ सुरु केली आणि मुस्लिम स्त्रियांना फारकत घेण्याची सोय करावी अशी मागणी जोर धरली.[17] म्हणून हा विवाह विच्छेदनाचा कायदा करून मुस्लीम स्त्रियांच्या फारकतीची सोय करण्या-या आली. असे असून ही हा विवाह विच्छेदनाचा कायदा जम्मु काश्मिर सारख्या काही राज्यात लागू केला जात नाही.

तसेच आसाम बिहार, ओरिसा आणि पं. बंगाल भारतातल्या या राज्यात विवाहासाठी ऐच्छिक नोंदणी पध्दतीने आणि त्याच पध्दतीने घटस्फोट घेण्यासंबंधीचे कायदे करण्यात आलेले आहेत. त्यात ही या चार राज्यांनी त्या संबंधी केलेल्या कायद्यात तफावत आहे. विशेष म्हणजे भारतातील बाकीच्या राज्यात अशा प्रकारचे कायदे केलेले नाहीत.[18]

आणखीन एक लक्षात घेण्यासारखी गोष्ट म्हणजे भारतातील न्यायालयाना त्यांच्या समोर आलेल्या खटल्यातील मुसलमान व्यक्तींनी ज्या कायदे पध्दतीला संमती दिली असेल, त्या कायदे पध्दती शिवाय दुस-या कायदया पध्दतीचा वापर करता येत नाही म्हणजे उदा. एखादया व्यक्तीचा मालकी कायदेपध्दतीचा आग्रह असेल तर न्यायालयाला हनफी पध्दती किंवा कुराण किंवा सुन्ना यांच्या आधाराने निर्णय देता येत नाही तेव्हा अशा प्रकारच्या अनेक उलटसुलट तरतूदी, मुस्लीम व्यक्तिगत कायदयासंबंधी अस्तित्वात आहेत, म्हणजे यावरून एक गोष्ट स्पष्ट होते, मुस्लिम व्यक्तिगत

कायदा भारतातील सर्व राज्यात एक सारखा नाही. तो भारतातील सर्व मुसलमानांना एक सारख्या पद्धतीने लागू केला जात नाही.

ही परिस्थिती मुस्लिम व्यक्तिगत कायद्या संबंधी, ब्रिटिशानी आणि भारतातील कायदे मंडळानी केलेल्या तरतूदी संबंधी आहे. याही पेक्षा जास्त मतभिन्नता आणि उलटसुलट तरतूदी ही भारतात अस्तित्वात असणा-या मुसलमानांच्या चार कायदेपद्धती मध्ये दिसून येते. भारतातील बहुसंख्य सुन्नी मुसलमाना हनफी कायदे पद्धती लागू होते दक्षिणेकडील राज्यात शाफई कायदे पद्धती चालते या शिवाय " शिया" पंथीयाची स्वत:ची वेगळीच कायदे पद्धती अस्तित्वात आहे आणि पश्चिमेकडील प्रदेशातील अनेक मुस्लिम जमाती इस्माईली कायदे पद्धतीचा पुरस्कार करताना दिसून येतात. या वेगवेगळ्या कायदे पद्धतीत अनेक तात्विक भेद अस्तित्वात आहेत. त्यामुळे त्यांच्या त्यांच्या व्यक्तिगत कायद्या संबधी वेगवेगळ्या प्रकारच्या तरतूदी दिसून येतात त्यांच्या वारसा हक्काच्या कायद्यात खुप तफावत दिसून येते. तोच प्रकार विवाहा संबंधीच्या पद्धती बद्दल देखील आहे. याशिवाय त्यांच्या कायदेविषयक प्रक्रियेत देखील तफावत आहे. उदा : सुन्नी कायद्यानुसार विवाहाच्या वेळी साक्षीदाराची गरज असते. परंतु घटस्फोटाच्या वेळी तशी तरतूद नाही.[१९] शिया लोकांचा कायदा नेमका याच्या उलट आहे.

भारतातील सुन्नी हनफी आणि शाफई कायदे पद्धतीबद्दल समान आदर बाळगतात परंतु " शिया " कायदे पद्धतीबद्दल किंवा ईस्माई कायदे पद्धतीबद्दल त्यांची मते भिन्न असतात. त्याप्रमाणेच शियां मुसलमानांना हनफी शाफई कायदे पद्धती मान्य नसते. त्यामुळे

शिया लोकांच्या " इश्ना अशारी ", कायदे पध्दतीमधील काही चांगल्या तरतुदी पासून, सुन्नी मुसलमान वंचित राहिलेले दिसून येतात. भारता बाहेरील अनेक देशात इस्लाम मधील सुन्नी आणि शिया लोकांच्या सर्व कायदे पध्दतींना समान मान्यता देण्यात आली तरी भारतात तशी परिस्थिती नाही .[२०]

प्रत्यक्षात जो मुस्लिम व्यक्तिगत कायदा भारतात अस्तित्वात आहे त्याच्या उत्पत्ती साधना संबंधी प्रा. फैजी यांनी केलेले विश्लेषण महत्वाचे आहे. त्यांच्या मते प्रत्यक्ष व्यवहारात " शारिया " किंवा " फिकाह " म्हणजे ब्रिटिशांच्या काळात प्रस्थापित झालेली तत्वे असतात. त्या संबंधीची काही उदाहरणे वर दिलेलीच आहेत. दुसरे उत्पत्ती साधन ब्रिटिशांच्या काळात आणि स्वातंत्र्यानंतर केलेले कायदे, तिसरे उत्पत्ती साधन न्यायालयीन निर्णय चौथे प्रस्थापित रूढी आहे. जेव्हा एखादा प्रश्न निर्माण होतो. तेव्हा कायदेपंडित न्यायाधिश प्रस्थापित कायदेविषयक पुस्तकांची मदत घेतली आह जाते. उदा. हॅमिल्टन यांनी केलेले " हिदाया " चे भाषांतर किंवा बेली यांनी केलेले " फतवा-ए-आलगिरी " चे भाषांतर ( ही भाषांतरे कशा स्वरूपाची होती. याचे विश्लेषण मागे दिलेलेच आहे. परंतु प्रा. फैजी यांचे प्रतिपादन आहे कि जेव्हा प्रत्यक्ष एखादा खटला न्यायालयासमोर येतो तेव्हा कायदे पंडित तय्यबजी, मुल्ला, विल्सन, किंवा अमीरअली, यांनी लिहिलेल्या कायदेविषयक पुस्तकांचाच आधार घेतात. त्याचप्रमाणे संबंधित खटला १९१३ " वक्फ " चा कायदा. १९३७ चा शारियत कायदा, १९३९ चा मुस्लिम विवाह विच्छेदनाचा कायदा किंवा १९५४ चा स्पेशल विवाह कायदा यांच्याशी जोडता येतो का हे पाहण्याचा प्रयत्न करतात.[२१] प्रा. फैजी यांचे हे विश्लेषण भारतातल्या मुस्लिम व्यक्तीगत कायदयावर प्रकाश टाकणारे आहे. पुढे त्यांनी आणखीन एक महत्वाचे विश्लेषण दिले आहे ते म्हणतात कि मुस्लिम व्यक्तीगत कायदया संबंधीचे खटले आपली न्यायालये चार प्रकारात विभागतात असे खटले की ज्या ठिकाणी "मुस्लिम व्यक्तीगत कायदा " इंग्लिश कायदयाप्रमाणे आहे.

२. असे खटले कि ज्यामध्ये इंग्लिश कायदयाने मुस्लिम व्यक्तीगत कायदयात बदल घडविलेले आहे.

३. ज्या खटल्यात मुस्लिम व्यक्तीगत कायदयात स्थानिक परंपरागत रुढीनुसार बदल करण्यात आलेले आहे.

४. ज्या खटल्यात शासनाने कायदा करुन मुस्लिम व्यक्तीगत कायदयात बदल केले आहे तो रद्द केला आहे.

यावरुन " शरियत " किंवा " फिकाह " आणि भारतात अस्तित्वात असलेला मुस्लिम व्यक्तीगत कायदा यातील अंतर स्पष्ट होते म्हणून हे विश्लेषण करुन प्रा. फैजी म्हणतात की न्यायालयासमोर आलेल्या खटल्याचा विचार करताना कुराणातील श्लोक किंवा हदीस मधील वचने किंवा जाफर अल सादिक अबूहनीफा" मलिक, शाफई आणि इमाम हंबल या थोर इमामाच्या ग्रंथातील उतारे देवून आणि "अलाह - प्रणित कायदयाचे नाव घेवून गोंधळ निर्माण करणे योग्य नाही.[२२]

भारतात ज्या ज्या वेळी मुस्लिम व्यक्तीगत कायदयाचा प्रश्न निर्माण होतो. त्या त्या वेळी पोथी निष्ठ धर्म पंडित असाच प्रकार करीत असतात.

वरील प्रकारे मुस्लिम व्यक्तीगत कायदयाच्या स्वरुपाचा विचार केल्यानंतर भारतातल्या मुसलमानांना लागु होणाऱ्या कायदयाचा थोडक्यात विचार करणे उद्‌बोधक होईल, कारण त्यावरुन भारतातले मुस्लिमाचे व्यक्तिगत जीवन हे कुराणामधल्या किंवा हदीस मधल्या नियमांनी नियंत्रित होते, का कायदेमंडळानी केलेल्या कायदयानी कितपत नियंत्रित होते हे स्पष्ट होते. मुस्लिमाचे जीवन नियंत्रित करणारे ते कायदे मंडळाचे कायदे खालीलप्रमाणे आहे.

१. १८४३ चा गुलामगिरीचा प्रथा नष्ट करणारा कायदा

२. धर्मांतरा संबंधीचा १८५० चा कायदा पूर्वी इस्लामच्या पारंपरिक कायदयानुसार एखादया मुस्लिम माणसाने धर्मांतर केल्यास त्यांचे वारसा हक्क नष्ट होत असे. काही वेळा तर धर्मांतराबद्दल त्या व्यक्तीला मृत्युदंडाची शिक्षा दिली जाईल. १८५० च्या कायदयाने हे रद्द करण्यात आलेले आहे.

३. फौजदारी कायदा - पूर्वी मुस्लिम व्यक्तींना इस्लामी फिकाहा नुसार फौजदारी गुन्हासाठी शिक्षा केली जात असे परंतु१८ १८६० मध्ये लॉर्ड मेकॉले यांनी इस्लामचा फौजदारी कायदा रद्द करुन मुस्लिमासहित सर्व भारतीय लोकांना भारतीय दंड संहिता इंडियन पिनल कोड) लागू केला होता.

४. हायकोर्ट : १८६१ मध्ये मुंबई, मद्रास, कलकत्ता याठिकाणी उच्च न्यायालयाची स्थापना करण्यात आली. त्यामध्ये मुस्लिम व्यक्तीच्या खटल्यातील न्यायदानाचे काम मुस्लिम न्यायाधिशा ऐवजी कोणाही पात्र असलेल्या न्यायाधिशाला चालविण्याचा अधिकार देण्यात आला.

५. पुराव्या संबंधीचे कायदे : १८७२ मध्ये ब्रिटिशांना भारतीय पुरावा मंजूर करुन इस्लामी पुरावा कायदारद्द केला. हिंदू आणि मुसलमानांना त्या बाबतीत एकाच कायदया खाली आणले.

६. कौटुंबिक वक्फ : हा कायदा करुन पूर्वी " प्रिव्ही" कौन्सिल ने केलेले नियम रद्द करण्यात आले.

७. " शारियत " चा कायदा : १९३७ मध्ये हा कायदा करुन मुस्लिम व्यक्तीचे विवाह-घटस्फोट वारसा हक्क वैगरे बाबी त्या कायदया खाली आणण्यात आल्या.

13145
A

८. विवाहविच्छेदनाचा कायदा : पूर्वी हनफी पंथाच्या स्त्रियांना पतीचे
किती ही दोष असले तरी घटस्फोटाचे हक्क नव्हते. १९३९
च्या या कायद्याने असे हक्क देण्यात आले. मालिकी पंथातील
स्त्रियांना अनुकुल असलेले नियम सर्व पंथाच्या मुसलमानांना लागू
करण्यात आले.

९. विमा पॉलशी बद्दलचा कायदा : पूर्वी विमा पॉलशीचा
हक्क नव-याच्या मृत्यूनंतर बायकोच्या नावे करता येत नव्हता
हा कायदा करून तशी सोय करण्यात आली. त्याही पुढे जावून
मुस्लिम व्यक्तीला विमा च्या हक्क कोणालाही देण्याचे
अधिकार देण्यात आले.

10. धर्मनिरपेक्ष विवाह : सिव्हिल मॅरेज : १९५४ चा विशेष
विवाह कायदा करून धार्मिक विधीशिवाय नोंदणी पध्दतीने
विवाह करण्याची परवानगी मुस्लिम व्यक्तीला देण्यात आली.
" निकाह " पध्दतीने झालेल्या विवाहाची देखील नोंद करण्याची
तरतूद करण्यात आली परंतू हा कायदा ऐच्छिक स्वरूपाचा ठेवण्यात
आला.

वर नमूद केलेल्या कायद्यावरून एक मुद्दा लक्षात येतो. तो म्हणजे
भारतातील मुस्लिम व्यक्तीगत कायद्याचे स्वरूप कसे आहे या तथा-
कथित मुस्लिम व्यक्तीगत कायद्यात कुराण आणि हदिस यांचा अंश
किती आहे, या मुस्लिम व्यक्तीगत कायद्यात ब्रिटिशांनी कोण-
कोणत्या गोष्टी घातलेल्या आहेत. आणि त्यामध्ये कायदे मंडळाने
केलेल्या कायद्याचे प्रमाण किती आहे. एक गोष्ट स्पष्ट होते की
भारतात असणारा मुस्लिम व्यक्तीगत कायदा आणि कुराण प्रणीत
मुळ शारियत या दोन गोष्टी वेगळ्या आहेत. या मुस्लिम व्यक्तीगत
कायद्यात कुराण, हदिस, सुन्ना यातील अंश असले तरी त्यात
खूप बदल करण्यात आले आहेत. तसेच इस्लाम मधील चार इमामांनी
निर्माण केलेल्या चार कायदे पध्दतीचा थोड्याबहुत प्रमाणात

मुस्लिम व्यक्तीगत कायदयात आधार घेतलेला असलातरी त्यामध्ये देखील खूप बदल करण्यात आलेले आहे. या मुस्लिम व्यक्तीगत कायदयात मुल्ला मौलवी नी लावलेले अर्थ, ब्रिटिश कायदे पंडितानी केलेली अर्धवट व चूकीची भाषांतरे आणि मुल्लासारखे कायदे पंडितानी मुळ ग्रंथ न वाचताच त्यानुसार लिहलेली पुस्तके हे सर्वाधिक त्यात आहेत. म्हणजेच भारतातील तथाकथित मुस्लिम व्यक्तीगत कायदा पूर्णपणे मनुष्यनिर्मित आहे आणि इस्लामच्या श्रध्देनुसार अल्लाहने निर्माण केलेला नाही.

# प्रकरण दुसरे

## संदर्भ टीपा


| | | |
|---|---|---|
| १. | ए. ए. ए. फैजी | दि रिफार्म ऑफ मुस्लिम पर्सनल लॉ इन इंडिया, नचिकेत पब्लिकेशन- १९७१ पान १०, ११. |
| २. | ए. ए. ए. फैजी | पान, ६. |
| ३. | ताहीर मेहमुद | मुस्लिम पर्सनल लॉ- विकास, १९७७ पान नं. ४, ५. |
| ४. | ताहीर मेहमुद | पान ४ |
| ५. | एम. पी. जैन | आऊट लाईन्स ऑफ इंडियन लिगल हिस्टरी, १९६६, पान, ६८ ते ८२. |
| ६. | ताहीर मेहमुद | पान ८, ९. |
| ७. | ताहीर मेहमुद | पान १३, १४. |
| ८. | ताहीर मेहमुद | पान, २०, २१. |
| ९. | ताहीर मेहमुद | पान २९, ३०. |
| १०. | फरिदी आणि सिद्दीकी | मुस्लिम पर्सनल लॉ इस्लामिक रिसर्च सर्कल, अलीगढ १९७३ मौलाना रहमानी पान ६६, ६७ |
| ११. | ताहीर मेहमुद | पर्सनल लॉज इन क्रायसेस मेट्रो पॉलिटन १९८६ पान ५१, ५२. |
| १२. | ताहीर मेहमुद | उपरोक्त पान, ५१. |

| | | |
|---|---|---|
| १३. | डी. एफ. मुल्ला, | प्रिन्सीपल्स ऑफ मॉहमेडन लॉ १८ आवृत्ती, १९७७ सेक्शन २५०. |
| १४. | डी. एफ. मुल्ला | पान २२५ |
| १५. | ताहीर मेहमुद | ॲन इंडियन सिव्हिल कोड ॲंड इस्लामिक लॉ, त्रिपाठी १९७६ पान ६९,७०. |
| १६. | ताहीर मेहमुद | उपरोक्त पान. ७०. |
| १७. | ताहीर मेहमुद | उपरोक्त पान ५९,६०. |
| १८. | ताहीर मेहमुद | उपरोक्त पान ७१ |
| १९. | ताहीर मेहमुद | उपरोक्त पान ७५,७६ |
| २०. | ताहीर मेहमुद | पान ७६,७७. |
| २१. | ए. ए. ए. फैजी | पान ११, १२. |
| २२. | ए. ए. ए. फैजी | उपरोक्त पान ११ |